**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 04.10.2025** **वार- शनिवार**

---

**<u>नियुक्ती</u>**

पुणे जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात आज 771 उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात आलं. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी यावेळी उमेदवारांना दूरस्थ पद्धतीनं संबोधित करताना राज्याच्या प्रशासनात नव्या दमाचे उमेदवार येत आहेत, त्यांनी परंपरा, निष्ठा आणि सचोटीचा वारसा पुढे न्यावा असा सल्ला दिला.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात अनुकंपा नियुक्तीद्वारे गट क आणि ड संवर्गात आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून लिपिक टंकलेखक पदी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रं देण्यात आली.

**<u>यादी</u>**

पुणे जिल्ह्यातील 14 नगरपरिषदा आणि तीन नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी येत्या बुधवारी प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यावर 13 ऑक्टोबरपर्यंत हरकती आणि सूचना दाखल करता येतील. राज्य निवडणूक आयोगानं एक जुलै अर्हता दिनांक निश्चित केला असून त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे, अशी माहिती नगर विकास विभागाचे उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांनी दिली.

**<u>प्रभागरचना</u>**

पुणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक आयोगानं अंतिम प्रभाग रचनेला काल मान्यता दिली. या रचनेवर एकंदर पाच हजार 922 हरकती आल्या होत्या. त्यापैकी 1 हजार 329 हरकती आणि सूचना पूर्णतः तर 69 अंशतः मान्य करण्यात आल्या. 9 प्रभागांची नावं बदलण्यात आली आहेत.

**ई-समर्थ**

स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आमदारांना मतदारसंघातील कामांसाठी दरवर्षी मिळणाऱ्या पाच कोटी रुपयांच्या निधीचा कार्यक्षम आणि पारदर्शक वापर होण्यासाठी राज्य सरकारनं 'ई-समर्थ' ऑनलाइन प्रणाली सुरू केली आहे. प्रायोगिक तत्त्वावर पुणे जिल्ह्यात ही प्रणाली लागू केली असून आगामीकाळात संपूर्ण राज्यात लागू केली जाणार आहे. यामुळं आमदारांना थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडं विकासकामांचे प्रस्ताव पाठविता येतील, तसंच त्यांचा वास्तविक वेळेत मागोवा घेता येईल. पुणे जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रणाली विकसित केली आहे.

**महिला-रुग्णालय**

पुण्यातील  औंध जिल्हा रुग्णालयाच्या आवारात लवकरच अतिविशेषोपचार रुग्णालय बांधण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचं दोनशे रुग्णशय्येचं अतिविशेषोपचार आणि दोनशे रुग्णशय्येचं महिला रुग्णालयाचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव जिल्हा शल्यचिकित्सकांनी मंजुरीसाठी आरोग्य विभागाच्या सहसंचालकांकडे पाठविला आहे अशी माहिती आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉक्टर भगवान पवार यांनी दिली.

**शरद पवार**

राज्याच्या अनेक भागात शेतक-यांचं अतिवृष्टी आणि पुरानं अतोनात नुकसान झालं आहे, या शेतक-यांना तातडीनं दिलासा देण्यासाठी राज्य सरकारनं शेतक-यांना आर्थिक मदत वितरीत करावी, असे आवाहन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज पुण्यात केलं. दरम्यान खासदार सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट घेऊन त्यांनाही केंद्राच्या वतीनं महाराष्ट्रातील शेतक-यांना अतिरिक्त निधी आणि भरघोस मदतीची मागणी केली आहे.

**मदत**

पुण्याच्या माजी नगरसेविका हर्षाली माथवड यांनी सांस्कृतिक कार्यक्रम रद्द करून पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला आहे. माथवड यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी आर्थिक मदत जमा केली असून, पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी जीवनावश्यक वस्तूंचे संच भाजपाच्या, पुणे कार्यालयात सुपूर्त केले आहेत.

**वेबपेज**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या कामकाजात तांत्रिक पारदर्शकता आणि गतीशीलता आणण्यासाठी स्वतंत्र वेबपेज बनवण्यात आलं आहे. सर्व योजना आणि उपक्रमांची माहिती नागरिकांना अधिक सुलभतेनं उपलब्ध व्हावी, तसेच अर्ज प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग वाढावा यासाठी समाज विकास विभागाचं स्वतंत्र वेबपेज तयार करण्यात आले आहे. महापालिकेच्या संकेतस्थळावरील “महत्वाचे” या सदरामध्ये “समाज विकास विभाग” या उपसदारातून नागरिकांना या नव्या वेबपेजला भेट देता येईल.

**मराठी**

पिंपरी चिंचवड महापालिका तसंच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद यांच्या सहकार्यानं अभिजात मराठी भाषा सप्ताह’ साजरा करण्यात येत आहे. त्यामध्ये आज सकाळच्या सत्रात लाभले आम्हास भाग्य’ हे मराठी नाटक सादर करण्यात आले. त्यानंतर कवी सुरेश भट यांच्या ‘लाभले आम्हास भाग्य’ या अजरामर कवितेनं वातावरण भारावून टाकलं. भक्तिगीतंही सादर करण्यात आली. दुपारच्या सत्रात पु.ल. देशपांडे यांच्या ‘माझे खाद्य जीवन’ आणि ‘उरले सुरले’ या विनोदी लेखांचं आनंद इंगळे यांनी वाचन केलं. इंद्रायणी काठी’ या गीतानं या साहित्यिक सोहळ्याचा समारोप झाला.

**कोजागिरी**

कोजागरी पौर्णिमेनिमित्त सोमवारी पुणे शहरातील महापालिकेची सर्व उद्यानं सकाळी 6 ते रात्री 12 वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुली ठेवली जाणार आहेत. पुणे महापालिकेची शहरातील विविध भागांत 216 उद्यानं, एक मत्स्यालय आणि एक प्राणी संग्रहालय आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**